# 'मेट्रो-३'च्या भुयारीकरणाचा ३६वा टप्पा पूर्ण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या संपूर्ण भुयारी 'मेट्रो-३' मार्गिकेवरील भुयारीकरणाचा ३६ वा टप्पा शुक्रवारी पूर्ण झाला. सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ या पॅकेज ६ मधील दोन स्थानकांदरम्यानचे १.५ किमी भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. त्याबरोबरच एकूण मार्गिकेवरील ९३ टक्के भुयारीकरण (५०.३ किमी) पूर्ण झाले आहे.

'मेट्रो-३'मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम सध्या वेगात सुरू असून ४१ टप्प्यांपैकी ३६ टप्पे पूर्ण झाले आहेत. तसेच पॅकेज ६ मधील १०० टक्के भुयारीकरणही (एकूण ४.४ किमी) पूर्ण झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) दिली. या पॅकेजसाठी तापी १ आणि तापी २ या दोन टनेल बोअरिंग यंत्राचा (टीबीएम) वापर करण्यात आला. शुक्रवारी ३६ वा टप्पा पूर्ण होताना कोची मेट्रो रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक अल्केश शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.



'पॅकेज ६ मधील १०० टक्के भुयारीकरण पूर्ण करून एमएमआरसीने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या पॅकेजमधील दोन स्थानके आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनलवर आहेत. या दोन्ही स्थानकांना विमानतळाशी जोडले जाईल, त्यामुळे विमानतळापर्यंत प्रवास करणे अधिक सोयीस्कर होणार आहे,' असे एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले.'हार्ड रॉक तंत्रज्ञानाने सुसज्ज टेराटॅक निर्मित टीबीएम तापी १ आणि २ द्वारे १५ महिन्यात भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.